# लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात मनरेगाचे योगदान

**प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
श्री कुमारस्वामी महाविद्यालय औसा, जिल्हा-लातूर.

**सारांश:**

*"भारताच्या ग्रामीण विकासासाठी ग्रामीण गरिबांना कायद्यानुसार १०० दिवस रोजगाराची वेतनासह हमी देणारी, सामाजिक समावेशनास स्थान देणारी, वेतनातील लिंग असमानता दूर करणारी व ग्रामीण भागात जीवन जगण्याच्या संधी निर्माण करण्याबरोबर शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता निर्माण करणारी सर्व व्यापक व सर्व समावेशक अशी योजना तयार करून त्यास कायद्याचे स्वरूप देण्यात आले व ५ सप्टेंबर २००५ रोजी मनरेगा हा कायदा भारतीय संसदेमध्ये मंजूर करण्यात आला. २ फेब्रुवारी २००६ पासून हा कायदा योजनेच्या स्वरुपात संपूर्ण ग्रामीण भारतात लागू झाला.महाराष्ट्र हे आर्थिक विकासाच्या दृष्टीने देशातील एक महत्त्वपूर्ण राज्य आहे. महाराष्ट्रातील मराठवाडा या विभागातील लातूर हा एक बालाघाट पठारावर वसलेला दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. लातूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण स्थूल उत्पन्नात लातूर जिल्ह्याचे योगदान १.४५% इतके आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ७४.५३% लोकसंख्या कृषी व संलग्न क्षेत्रावर उपजीविकेसाठी अवलंबून आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमानाचे प्रमाण अत्यंत अल्प असून कृत्रिम जल साठवणूक व कृषी सिंचनाच्या सुविधाही अत्यल्प आहेत. परिणामी ग्रामीण भागात लोकांची दारिद्र्य व बेरोजगारीची स्थिती गंभीर असून राहणीमानाचा दर्जा न्यूनत्तम आहे.मनरेगा योजनेच्या माध्यमातून वेतनासह रोजगाराच्या संधी देण्याबरोबरच सामाजिक समावेशन करणे,ग्रामीण लोकांच्या जीवनमानाचा दर्जा सुधारणे व उपजीविकेच्या साधनासह शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता निर्माण करणे या दृष्टीने मनरेगा योजना ही लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासासाठी महत्वपूर्ण कार्य करत आहे."*

**प्रस्तावना:**

महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज संकल्पनेनुसार खरा भारत हा खेड्यांमधून वसलेला आहे. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतामध्ये श्रमिक भांडवल मुबलक आहे. त्यामुळे भारताच्या प्रत्येक खेड्यातील नैसर्गिक संसाधनाचा उपलब्ध श्रम बळाच्या साह्याने पर्याप्त वापर करून देशाचा विकास साधता येतो. यासाठी विकासाची प्रत्येक योजना ही खेड्यांमधून सुरू केली पाहिजे असे गांधीजीचे मत होते. देशाच्या स्वातंत्र्यानंतरच्या ७५ वर्षात ही आपण नियोजनाच्या माध्यमातून सर्वसामान्य भारतीयांच्या मूलभूत गरजा ही पूर्ण करण्यामध्ये यशस्वी ठरलो नाहीत. देशातील दारिद्र्य, बेरोजगारी कमी करण्यासाठी नियोजनाच्या माध्यमातून राबवलेल्या अनेक योजना या सरकार केंद्रित व सरकारचलित होत्या. या योजनांची परिणामकारकता फारशी लाभदायक ठरली नाही. ग्रामीण गरिबांना कायद्यानुसार १०० दिवस रोजगाराची वेतनासह हमी देणारी, अनुसूचित जाती/जमाती,महिला व दिव्यांग,सीमांत व अल्पभूधारक शेतकरी यांच्या समावेशनास स्थान देणारी, वेतनातील लिंग असमानता दूर करणारी व ग्रामीण भागात जीवन जगण्याच्या संधी निर्माण करण्याबरोबर शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता निर्माण करणारी सर्व व्यापक व सर्व समावेशक अशी योजना तयार करून त्यास कायद्याचे स्वरूप देण्यात आले व ५ सप्टेंबर २००५ रोजी मनरेगा हा कायदा भारतीय संसदेमध्ये मंजूर करण्यात आला.मनरेगा हि योजना केवळ भारतातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील सर्वात मोठी,सर्वव्यापक व सर्वसमावेशक योजना म्हणून गणली गेली.२ फेब्रुवारी २००६ पासून हा कायदा भारतातील आर्थिक दृष्ट्या मागास असलेल्या २०० जिल्ह्यामध्ये लागू झाला.वर्ष २००७-०८ मध्ये त्याचा विस्तार आणखीन १३० जिल्ह्यामध्ये करण्यात आला.योजनेची यशस्वीता पाहून १ एप्रिल २००७ पासून देशातील आणखीन ११३ जिल्ह्यांमध्ये व १५ मे २००७ पासून उत्तर प्रदेशातील ७ जिल्ह्यामध्ये ही योजना लागू करण्यात आली आणि अखेर १ एप्रिल २००८

पासून भारतातील सर्व जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू करण्यात आली.सध्यस्थितीत मनरेगा योजना संपूर्ण भारतातील ७४१ जिल्ह्यामधून ग्रामीण विकासामध्ये महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये मनरेगा योजनेतून एकूण १४.२१ कोटी जॉब कार्ड जारी करण्यात आले यापैकी ९.४ कोटी जॉब कार्ड सक्रिय आहेत जे योजनेअंतर्गत कामासाठी नोंदणी केलेल्या श्रमिकांची संख्या दर्शवितात. योजनेअंतर्गत एकूण २४.८१ कोटी श्रमिकांना रोजगार उपलब्ध करून देण्यात आला आहे.

लातूर हा मराठवाडा विभागातील बालाघाट पठारावर वसलेला एक अत्यंत महत्वपूर्ण जिल्हा आहे.लातूर जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ ७,१५७ चौ. कि.मी. असून ते महाराष्ट्र राज्याच्या २.३२% व औरंगाबाद विभागाच्या ११.४% आहे. जिल्ह्यात १० तालुके व ५ उपविभाग आहेत. लातूर जिल्ह्यात एकूण ९४८ गावे असून त्यापैकी वस्ती असलेल्या गावांची संख्या ९२८ इतकी आहे. तर निर्जन गावांची संख्या २० इतकी आहे. समुद्र सपाटीपासून लातूर जिल्ह्याची उंची ४४० ते ६३६ मीटर उंच आहे.

वर्ष २०११च्या जनगणनेनुसार लातूर जिल्ह्याची लोकसंख्या २४,५४,१९६ इतकी असू शहरी लोकसंख्या ६,२४९८०(२५.४७%) इतकी आहे. तर ग्रामीण लोकसंख्या १८,२९,२१६ (७४.५३%) इतकी आहे. लातूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याच्या एकूण स्थूल उत्पन्नात लातूर जिल्ह्याचे योगदान १.४५% इतके आहे. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येच्या ७४.५३% लोकसंख्या कृषी व संलग्न क्षेत्रावर उपजीविकेसाठी अवलंबून आहे. जिल्ह्यामध्ये पर्जन्यमानाचे प्रमाण अत्यंत अल्प असून कृत्रिम जल साठवणूक व कृषी सिंचनाच्या सुविधाही अत्यल्प आहेत. परिणामी ग्रामीण भागात लोकांची दारिद्र्य व बेरोजगारीची स्थिती गंभीर असून राहणीमानाचा दर्जा न्यूनत्तम आहे. लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासामध्ये किंबहुना लोकांचे राहणीमान उंचविण्यासाठी मनरेगा योजना रोजगारातील सामाजिक समावेशनासह उपजीविकेची साधने निर्माण करण्यामध्ये महत्त्वपूर्ण योगदान देत आहे.

**संशोधन विषयाचे महत्व:**

लातूर जिल्हा हा अवर्षणप्रवण व दुष्काळग्रस्त जिल्हा असून येथे सरासरीपेक्षा अत्यंत अल्प पर्जन्यमान होते. जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी सुमारे ७४.५३% लोकसंख्या ग्रामीण भागामध्ये वास्तव्यास आहे. त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन हे कृषी व्यवसाय आहे. जिल्ह्यातील कृषी व्यवसाय हा मोसमी पर्जन्यमानावर अवलंबून असल्यामुळे कृषी क्षेत्रातील उत्पादन आणि उत्पादकतेच्या बाबतीत कमालीची अनिश्चितता आहे. परिणामी लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात उपजीविकेची आवश्यक साधने व संधी नसल्याकारणाने दारिद्र्य व बेरोजगारीचे प्रमाण अधिक आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे. लातूर सारख्या आवर्षणग्रस्त व दुष्काळजन्य जिल्ह्यामध्ये शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता निर्माण करून ग्रामीण गरिबांना उपजीविकेची साधने उपलब्ध करून देणे व रोजगाराच्या आश्वासक संधी निर्माण करून देण्यामध्ये मनरेगा योजनेची परिणामकारकता अभ्यासण्यासाठी सामाजिक शास्त्रातील अर्थशास्त्र या विषया अंतर्गत संशोधनाच्या दृष्टीने "लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे योगदान"(संशोधन कालावधी २०१४-१५ ते २०२३-२४) हा महत्त्वपूर्ण विषय ठरतो.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व निदानात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासासाठी प्रामुख्याने जिल्ह्यातील १० तालुक्यातील,३० ग्रामपंचायत मधील, प्रत्येक ग्रामपंचायत मधून १० लाभार्थी असे जिल्ह्यातील एकूण ३०० मनरेगा लाभार्थी उत्तरदात्याकडून प्राथमिक माहितीचे संकलन केले आहे.संशोधनासाठी प्राथमिक व द्वितीय सामग्रीचा आधार घेतला असून त्यामध्ये प्रामुख्याने विविध शासकीय व निमशासकीय प्रकाशनाद्वारे प्रकाशित ग्रंथ, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, संबंधित शासन संस्थांचे विविध अहवाल इत्यादींचा अवलंब करण्यात आला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे:**

प्रस्तुत संशोधनाला योग्य दिशा प्राप्त होण्यासाठी काही उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत.

१. मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात निर्माण झालेल्या रोजगार संधी व सामाजिक समावेशनाचा शोध घेणे.
2. मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण विकासासाठी उत्पादक मालमत्तावर केल्या जाणाऱ्या खर्चाचा शोध घेणे.
3. मनरेगा मुळे लातूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेलल्या सुधारणांचा अभ्यास करणे.
4. महत्वपूर्ण निष्कर्ष काढणे व शिफारशी करणे.

VOL- XII ISSUE- VIII AUGUST 2025 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.379 ISSN 2349-638x

**गृहीतके:**

प्रस्तुत संशोधनामध्ये काही गृहीत परिस्थिती निश्चित करण्यात आली आहे ती पुढील प्रमाणे आहे.

१. मनरेगामुळे ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.

२. मनरेगा योजनेद्वारे ग्रामीण भागात शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता निर्माण होत आहेत.

३. मनरेगामुळे लातूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होत आहेत.

**मनरेगा अंतर्गत रोजगार संधी व सामाजिक समावेशन:**

पुढील सारणी मध्ये वर्ष २०१७-१८ ते वर्ष २०२३-२४ या कालावधीत मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या, मनुष्य दिवस रोजगार निर्मिती, प्रति कुटुंब सरासरी रोजगार तसेच मनरेगा अंतर्गत रोजगारातील सामाजिक समावेशन यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांचे रोजगारातील प्रमाण दर्शविण्यात आले आहे.

| अ. क्र. | तपशील | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोजगार पुरविलेल्या कुटुंबाची संख्या (लाख) | ०.४५ | ०.४५ | ०.२९ | ०.२५ | ०.५१ | ०.६० | ०.८७ |
| २ | रोजगार निर्मिती मनुष्य दिवस (कोटी) | ०.२२ | ०.२० | ०.१२ | ०.१३ | ०.२२ | ०.२४ | ०.५३ |
| ३ | प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ४९ | ४४ | ३९ | ५१ | ४४ | ४० | ६१ |
| ४ | रोजगारातील सामाजिक समावेशन प्रमाण(%) | | | | | | | |
| (i) | अनुसूचित जाती | १४ | १९.६९ | २५.३८ | १५.३ | १४.०९ | १२.२८ | ११.३८ |
| ii | अनुसूचित जमाती | १.६६ | १.३३ | १.११ | १.४७ | १.२५ | १.४३ | १.०६ |
| Iii | महिला | ४१.०९ | ४२.२२ | ४४.७ | ४४.३७ | ४२.२ | ४२.५६ | ४०.६४ |

उपरोक्त सारणी मध्ये लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या वर्ष २०१७-१८ मध्ये ०.४५ लाख इतकी होती.वर्ष २०२३-२४ मध्ये रोजगार पुरविलेल्या कुटुंबाच्या संख्येत यामध्ये ९३.३३% वाढ होऊन ०.८७ लाख इतकी वाढ झाल्याची दिसून येते.लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत वर्ष २०१७-१८ मध्ये ०.२२ कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली होती. वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये मनुष्य दिवस रोजगार निर्मितीमध्ये १४०.९०% वाढ होऊन ०.५३ कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आहे. मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये प्रती कुटुंब सरासरी रोजगार उपलब्धतेचा अभ्यास केला असता वर्ष २०१७-१८ वर्षामध्ये प्रति कुटुंब सरासरी ४९ दिवस रोजगार उपलब्ध झाला होता. वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये प्रति कुटुंब सरासरी रोजगार उपलब्धतेच्या प्रमाणात २४.४८% वाढ होऊन प्रति कुटुंब सरासरी ६१ दिवस रोजगार उपलब्ध झाल्याचे दिसून येते.

मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यात निर्माण होणाऱ्या रोजगारातील सामाजिक समावेशनाचा अभ्यास केला असता वर्ष २०१७-१८ मध्ये अनुसूचित जाती संवर्गातील कामगारांचे मनरेगातील एकुण रोजगारात १४% समावेशन

होते वर्ष २०१९-२० मध्ये हे प्रमाण २५.३८% पर्यंत वाढले आहे तर वर्ष २०२३-२४ मध्ये मनरेगा अंतर्गत एकूण रोजगारातील अनुसूचित जातीतील श्रमिकांचे प्रमाण ११.३८% इतके असल्याचे निदर्शनास येते.लातूर जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत रोजगारामध्ये अनुसूचित जमाती या संवर्गाचे वर्ष २०१७-१८ मध्ये १.६६% प्रमाण होते. वर्ष २०२०-२१ मध्ये हे प्रमाण १.४७% पर्यंत वाढले आहे. तर वर्ष २०२३-२४ मध्ये मनरेगा अंतर्गत रोजगारांमध्ये अनुसूचित जमातीचे प्रमाण १.०६% असल्याचे दिसून येते.मनरेगा अंतर्गत निर्माण झालेल्या रोजगारांमध्ये महिला श्रमिकांचे समावेशन अभ्यासले असता लातूर जिल्ह्यामध्ये वर्ष २०१७-१८ मध्ये मनरेगा अंतर्गत एकूण रोजगारात महिला श्रमिकांचे प्रमाण ४१.०९% होते वर्ष २०२०-२१ मध्ये या प्रमाणात वाढ होऊन ४४.३७% इतके झाले तर वर्ष २०२३-२४ मध्ये लातूर जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत रोजगारात महिला श्रमिकांचे प्रमाण ४०.६४% इतके असल्याचे निदर्शनास येते.

**मनरेगा अंतर्गत ग्रामीण विकासासाठी उत्पादक मालमत्तावर केलेला खर्च**:-

लातूर जिल्हा हा मुळातच मराठवाड्यातील पर्जन्य छायेखाली येणारा दुष्काळग्रस्त जिल्हा असून लातूर जिल्ह्यात ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ७४.५३% आहे. तसेच येथील ग्रामीण लोकांच्या उपजीविकेच्या साधनात कमतरता असून राहणीमानाचा दर्जा न्यूनत्तम आहे. त्यामुळे मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये निर्माण होणारी उपजीविकेची साधने व त्यावरील खर्चाचे प्रमाण प्रस्तुत संशोधनामध्ये अभ्यासले आहे.लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात मनरेगा अंतर्गत समग्र ग्रामीण विकासासाठी शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता प्रमुख चार श्रेणीअंतर्गत निर्माण केल्या जात आहेत.

**अ. नैसर्गिक साधन संपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित सार्वजनिक बांधकामे:-** प्रथम श्रेणीअंतर्गत लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जल पुनर्भरण पाणलोट विकास सूक्ष्म सिंचन व लघु पाटबंधाऱ्याची कामे, सिंचन तलाव, भूमिगत पाठ, मातीची धरणे रोधी धरणे, संरोधी धरणे, समतल चर, मजगी घालने, समतोल बांध, दगडी संरोधक, दगड मातीचे कक्षबांध (गॅबियन संरचना), सिंचन कालवे, नाली बांधणे त्याचे नूतनीकरण करणे व परिरक्षण करणे, सिंचन तलाव व इतर जलाशयातील गाळ उपसणे, सडक पट्ट्या, कालवा बांध, तलाव अग्रतट, वनरोपण वृक्ष लागवड आणि फलोत्पादन तसेच भूविकासाची कामे केली जात आहेत.

**ब. दुर्बल घटकाकरिता व्यक्तिगत मालमत्ता निर्माण करणे:-** द्वितीय श्रेणीअंतर्गत लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात दुर्बल घटकातील कुटुंबाच्या पडीक व ओसाड जमिनी लागवडीखाली आणणे व त्या जमिनीचा विकास करणे,पशुधन वाढीचे, हंगामी मत्स्य व्यवसाय विकास इत्यादी कामे करण्यात येत आहेत.

**क. एन.आर.एल.एम.अभियान अंतर्गत स्वयंसाहिता गटाकरिता सामायिक पायाभूत सुविधा:-** तृतीय श्रेणीअंतर्गत लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात जैविक खताकरिता आवश्यक असणाऱ्या शाश्वत पायाभूत सुविधा उभारणारी कामे केली जातात.

**ड. ग्रामीण विकासासाठी पायाभूत सुविधा:-** चतुर्थ श्रेणीअंतर्गत लातूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अंतर्गत पक्के रस्ते अथवा मार्ग बांधणे, खेळाची मैदानी उभारणे, पूर नियंत्रण व संरक्षणाची कामे, जलनिस्सारणाची कामे, पुराचे पाणी वाहून नेणारे प्रवाह मार्ग खोल करणे व त्यांची डागडुजी करणे, तटीय क्षेत्राच्या संरक्षणासाठी नाल्याचे बांधकाम करणे, ग्राम व गट स्तरावर ग्रामपंचायती महिला स्वयंसहायता गट, संघ, चक्रीवादळ छावणी अंगणवाडी केंद्रे, गाव बाजार व स्मशानभूमी इत्यादी करिता इमारती बांधणे. राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमा अंतर्गत अन्नधान्य साठवन इमारती बांधणे.इत्यादी स्वरुपाची कामे करण्यात येतात.

पुढील सारणी मध्ये वर्ष २०१७-१८ ते वर्ष २०२३-२४ या कालावधीत मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या, रोजगार निर्मिती मनुष्य दिवस, प्रति कुटुंब सरासरी रोजगार तसेच मनरेगा अंतर्गत रोजगारातील सामाजिक समावेशन यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिला यांचे रोजगारातील प्रमाण दर्शविण्यात आले आहे.

| अ.क्र. | तपशील | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्ण झालेल्या कामांची संख्या | ४८११ | १०८६० | ५८६१ | ३४१८ | ३५३२ | ६८१८ | ६९२० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | एकूण खर्च (₹ कोटी) | ७१.५५ | ७१.५४ | ३८.२७ | ४२.३५ | ७८.१२ | १००.०३ | २०३.६३ |
| ३ | एक दिवस रोजगार निर्मितीचा खर्च (₹) | २०१ | २०३ | २०६ | २३८ | २४८ | २५६ | २७३ |

वरील सारणी मध्ये लातूर जिल्ह्यात वर्ष २०१७-१८ मध्ये मनरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची संख्या ४,८११ इतकी होती. मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यामध्ये पूर्ण केल्या जाणाऱ्या कामाच्या संख्येत वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये ४५.८३% वाढ होऊन पूर्ण झालेल्या कामांची संख्या ६,९२० इतकी झाल्याची दिसून येते. लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत पूर्ण केलेल्या कामावर वर्ष २०१७-१८मध्ये ७१.५५ कोटी रुपये खर्च करण्यात आला होता. मनरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामावर करण्यात येणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात वर्ष २९१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये १८४.५९% वाढ होऊन २०३.६३ कोटी रुपये खर्च केल्याचे दिसून येते.

लातूर जिल्ह्यामध्ये वर्ष २०१७-१८ मध्ये मनरेगा अंतर्गत एक दिवस रोजगार निर्मितीचा खर्च २०१ रुपये इतका होता. लातूर जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत एक दिवस रोजगार निर्मितीच्या खर्चात वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये ३५.८२% वाढ होऊन हा खर्च २७३ रुपये इतका झाल्याचा दिसून येतो.एकंदरीत वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये मनरेगा अंतर्गत लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात निर्माण करण्यात येणाऱ्या उपजीविकेच्या साधनांची संख्या किंवा मनरेगा अंतर्गत पूर्ण केल्या जाणाऱ्या कामांची संख्या वाढत आहे तसेच त्यावरील एकूण खर्चात ही वाढ होत आहे. तसेच मनरेगा अंतर्गत एक दिवस रोजगार निर्मितीचा खर्च सुद्धा वाढला असल्याचे निदर्शनास येते. यावरून लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनरेगा अंतर्गत ग्रामीण गरिबांच्या उपजीविकेच्या साधनात वाढ होत असल्याचे लक्षात येते.

**मनरेगामुळे लातूर जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या सुधारणा:**

लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनरेगाच्या अंमलबजावणीमुळे लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या सुधारणा पुढील सारणी मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत.

| लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीत झालेल्या सुधारणा | लाभार्थी संख्या | प्रमाण(%) |
|---|---|---|
| मासिक बचतीमध्ये वाढ | ९७ | ३२.३३ |
| मुलांच्या शिक्षणात सुधारणा | १९४ | ६४.६६ |
| आरोग्य सुधारणा | २०८ | ६९.३३ |
| अन्न सुरक्षेत वाढ | २७३ | ९१.०० |
| राहणीमानात सुधारणा | १६५ | ५५.०० |
| संकट व्यवस्थापनात मदत | १३७ | ४५.६६ |
| जीवन जगण्यास मदत | ८७ | २९.०० |

वरील सारणीवरून मनरेगाच्या अंमलबजावणीमुळे ३२.३३% लाभार्थ्यांच्या मते लातूर जिल्ह्यातील ग्रामीण गरिबांच्या बचतीमध्ये वाढ झाली आहे.६४.६६% लाभार्थ्यांच्या मते मुलांच्या शिक्षणात सुधारणा करण्यासाठी मनरेगातील रोजगार उपयुक्त ठरत आहे.६९.३३% लाभार्थ्यांच्या मते मनरेगाच्या अंमलबजावणीमुळे आमच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे. ९१% लाभार्थींच्या मते अन्नसुरक्षिततेत वाढ होत आहे. ५५% लाभार्थ्यांच्या मते राहणीमानात सुधारणा झाली आहे. ४५.६६% लाभार्थ्यांनी मनरेगांमुळे आमच्या संकट व्यवस्थापनास मदत होत आहे असे मत व्यक्त केले आहे तसेच २९% लाभार्थ्यांनी मनरेगा ही जीवन जगण्यास मदत करणारी व्यवस्था आहे असे मत व्यक्त केले आहे.लाभार्थ्यांच्या या मतावरून लातूर जिल्ह्यातील ग्रामीण गरिबांच्या आर्थिक स्थितीत सुधारणात्मक बदल होत असल्याचे निदर्शनास येते.

**निष्कर्ष आणि शिफारशी:**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या अभ्यासावरून काही महत्वपूर्ण निष्कर्ष काढण्यात आले आहेत ते पुढील प्रमाणे आहेत.

**निष्कर्ष:**

१.लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत पुरविल्या जाणाऱ्या रोजगारात वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये ९३.३३% वाढ झाली आहे तर मनुष्य दिवस रोजगार निर्मितीमध्ये १४०.९०% वाढ झाल्याचे दिसून येते. याचबरोबर प्रती कुटुंब सरासरी रोजगार उपलब्धतेत वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये २५.४८% इतकी वाढ झाली आहे.

२.लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत पूर्ण झालेल्या कामांची संख्या वर्ष २०१७-१८ मध्ये ४,८११ इतकी होती. पूर्ण होणाऱ्या कामाच्या या संख्येत वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये ४३.८३% वाढ होऊन पूर्ण झालेल्या कामांची संख्या ६,९२० इतकी झाली आहे. म्हणजेच लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत उपजीविकेच्या साधनात वर्ष २०१७-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये ४३.८४% वाढ झाल्याचे दिसून येते.

३. लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत पूर्ण करण्यात आलेल्या कामावरील खर्चामध्ये वर्ष २०१७-१८च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये १८४.५९% वाढ होऊन २०३.६३ कोटी रुपये खर्च झाला आहे.

४.लातूर जिल्ह्यामध्ये मनरेगा अंतर्गत एक दिवस रोजगार निर्मितीच्या खर्चात वर्ष २०१८-१८ च्या तुलनेत वर्ष २०२३-२४ मध्ये ३५.८२% वाढ होऊन एक दिवस रोजगार निर्मितीचा खर्च हा २०१ रुपयावरून २७३ रुपये इतका झाल्याचा दिसून येतो.

५. लातूर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मनरेगा अंतर्गत निर्माण केल्या जाणाऱ्या शाश्वत स्वरूपाच्या उत्पादक मालमत्ता मुळे ग्रामीण गरिबांच्या उपजीविकेच्या साधनात वाढ झाली आहे परिणामी त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होत आहे. मनरेगामुळे जिल्ह्यातील ग्रामीण गरिबांच्या मासिक बचतीमध्ये वाढ, मुलांच्या शिक्षणात सुधारणा, आरोग्य विषयक सुधारणा, अन्नसुरक्षिततेत वाढ, राहणीमानात सुधारणा, संकट व्यवस्थापनात मदत, जीवन जगण्यास मदत इत्यादी स्वरूपाच्या आर्थिक सुधारणा होत असल्याचे दिसून येते.

**शिफारशी:**

१. ग्रामीण विकासासाठी मनरेगा योजना सुरू होऊन दोन दशकापेक्षाही अधिक कालावधी झाला आहे तरी परंतु मनरेगा अंतर्गत कामाची मागणी केलेल्या प्रत्येक कुटुंबाला १०० दिवस रोजगाराची हमी देण्यात यश आले नाही. वर्ष २०२३-२४ पर्यंत लातूर जिल्ह्यातील मनरेगा अंतर्गत ग्रामीण कुटुंबांना प्रति वर्ष- प्रति कुटुंब केवळ ६१ दिवस मनरेगा अंतर्गत रोजगार उपलब्ध झाला आहे. मनरेगा अंतर्गत प्रती वर्ष दिल्या जाणाऱ्या रोजगारात ३०० दिवस रोजगाराची हमी देण्यात यावी जेणेकरून रोजगार मागणाऱ्या हातांना राष्ट्राच्या उत्पादन कार्यात समाविष्ट करून आर्थिक विकासात वाढ करता येणे शक्य आहे.

२. मनरेगा अंतर्गत ग्रामीण गरिबांच्या उपजीविकेसाठी करण्यात येणाऱ्या खर्चाचे प्रमाण हे अत्यंत अल्प आहे. मनरेगा अंतर्गत विविध कामासाठी मजुरांना दिली जाणारी मजुरी ही अत्यंत कमी प्रमाणात आहे. मजुरांना दिली जाणारी मजुरी ही बाजार वेतनाप्रमाणे देण्यात यावी जेणेकरून ग्रामीण गरिबांच्या राहणीमानात सुधारणांची गती वाढेल.

३. मनरेगा अंतर्गत वैयक्तिक स्वरूपाच्या उत्पादक मालमत्तांची उत्पादकता वाढविण्यासाठी करण्यात येणाऱ्या कामांमध्ये जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील सर्वच अल्पभूधारक व सीमांत शेतकऱ्यांचा समावेश करण्यात यावा जेणेकरून ग्रामीण विकासात उत्पादक स्वरूपाच्या शाश्वत मालमत्ता मोठ्या प्रमाणात वाढून ग्रामीण विकासाची गती वाढेल.

४. मनरेगाच्या प्रशासकीय अंमलबजावणी प्रक्रियेतील विविध स्तरातील अधिकाऱ्यांमध्ये परस्पर समन्वय वाढवून मनरेगाच्या कार्याचा प्रसार प्रत्येक ग्रामीण गरिबापर्यंत पोहोचला पाहिजे व प्रत्येक ग्रामीण गरिबांना मनरेगा ही जीवन जगण्याचा आधार बनली पाहिजे.

**संदर्भसूची:**

१. डॉ. रिमकी पाटगिरी,(२०१८), 'पावर्टी एलिवेशन अँड मनरेगा: अ राइट्स बेस्ड पॉलिसी', हायब्रो स्क्रीबस पब्लिकेशन, न्यू दिल्ली-११००८५. पृष्ठ क्र.३२-३९.

२. मनोज कुमार बगोरिया,(२०१५), 'इम्पॅक्ट ऑफ मनरेगा ऑन रुरल पावर्टी', अ स्टडी ऑन सबरकांथा डिस्ट्रिक्ट ऑफ गुजरात, व्हीं. एल. एम. एस.

पब्लिकेशन्स, उत्तम नगर, न्यू दिल्ली-११००५९. पृष्ठ क्र.१९.

३. ज्योती भट्टाचार्य,(२०१९), 'इम्पॅक्ट ऑफ मनरेगा ऑन द एम्प्लॉयमेंट ऑफ वुमेन', ऑन द एम्पॉवरमेंट ऑफ वुमेन, अ केस स्टडी इन नॉर्थ ईस्ट इंडिया, इ.बी. एच. पब्लिशर्स, गुहावटी-७८००१(भारत). पृष्ठ क्र.२-३.

४. डॉ. पदम सिंह गजराज, मनरेगा अनुसूचित जाती जनजाती का विकास एवं सशक्तिकरण, (२०२३), अर्जुन पब्लिशिंग हाऊस, दरिया गंज, नई दिल्ली. पृष्ठ क्र.१०९-१६०.

५. डॉ. रजनीश कुमार,(२०२४),'रीजनल डायमेन्शन ऑफ पॉव्हर्टी अँड रुरल एम्प्लॉयमेंट इन इंडिया, ए.बी. डी. पब्लिशर्स, जयपुर -३०२०१८. पृष्ठ क्र.२५-३२.

६. ग्रामीण विकास मंत्रालय भारत सरकार, मनरेगा कामगिरी अहवाल वर्ष २०२३-२४, पृष्ठ क्र.१९,२२,२३.

७. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी-२०२३-२४,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,महाराष्ट्र शासन,मुंबई. पृष्ठ क्र.११५,१४७,१८४,१८७,१८८,२४७.

८. मनरेगा-महाराष्ट्र व राज्य रोजगार हमी योजना वार्षिक अहवाल वर्ष २०२३-२४,महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग (रोजगार हमी योजना),मुंबई. पृष्ठ क्र.१.

९. डॉ. दि.मा.मोरे, मराठवाड्याच्या विकासाचे वास्तव, (सप्टेंबर २०२३), द युनिक अकॅडमी पब्लिकेशन्स प्रा.ली.,पुणे. पृष्ठ क्र.१३,१७.

१०.जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन,जिल्हा-लातूर,विविध वर्षाचे अहवाल,अर्थ व सांख्यिकी संचालनालय,नियोजन विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई.

११.लातूर जिल्ह्यातील मनरेगा लाभार्थ्यांची प्राथमिक माहिती सामुग्री